महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==========================================================================

जावक क्रमांक –१२/२०९०७१२ दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०२६

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा मुख्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

मुंबई, दि. २७ फेब्रुवारी २०२६ : ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात लेखिका श्रीमती तपस्या नेवे यांचा 'शब्दशः' हा अभिजात मराठी भाषेच्या समृद्ध शब्दवैभवाचे दर्शन घडवणारा अभिवाचनात्मक सुसंवाद कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाद्वारे मराठी भाषेतील अभिजात शब्दसंपदा, अभिव्यक्तीची परंपरा आणि भाषेची सांस्कृतिक परिमाणे यांचा प्रभावी आढावा घेण्यात आला.

'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर अध्यक्षस्थानी तर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यकारी अभियंता श्रीमती मीनल जगताप, म्हाडाचे जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील, उपमुख्य अधिकारी श्री. योगेश देशमुख, उपमुख्य अधिकारी श्री. लक्ष्मण मुंडे, लेखाधिकारी श्री. सुनील इंगवले, म्हाडा कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. मोहनराव कोळी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी श्रीमती तपस्या नेवे यांनी सांगितले की, मराठी भाषेचा इतिहास सुमारे दोन ते अडीच हजार वर्षांपूर्वीचा आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेवरील संशोधनाला नक्कीच चालना मिळेल व प्राचीन साहित्याचे इतर भाषांमध्ये भाषांतर होण्यासाठी शासकीय स्तरावर प्रोत्साहन मिळेल असा विश्वास व्यक्त केला. तसेच राज्यातील ५२ बोलीभाषांना देखील बळकटी मिळेल, असे त्यांनी पुढे नमूद केले. मराठी विषय देशभरातील विद्यापीठांमध्ये शिकविला जात असून मराठीला ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर यांनी प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. मराठी भाषेतील अचूकता आणि शुद्धता जपण्यासाठी मराठी विश्वकोश व परिभाषा कोशांचा आधार घ्यावा, तसेच विरामचिन्हांचा योग्य वापर करावा, असे त्यांनी सांगितले.

सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले. संत, विचारवंत आणि शूरवीरांची परंपरा लाभलेल्या मराठी भाषेचे वैभव जपणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विशेषतः तरुण पिढीने मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिचा दैनंदिन व्यवहारात अधिक वापर करावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. हेमंत पाटील यांनी केले. या कार्यक्रमास म्हाडाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

###

(स्वाक्षरीत/-)
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


शब्दश:


(ग्रंथपाल, लेखिका, संपादक)
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी १२.०० वाजता
भारतरत्न गुलझारीलाल नंदा सभागृह, तिसरा मजला,







D:\Documents\Press Release\2026\12 म्हाडा मुख्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा.docx







